# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील बत्तिसावा रविवार - १२ नोव्हेंबर २०२३

## विश्वासू लोकांच्या प्रार्थना

धर्मगुरू : वंधू आणि भगिनीं म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद : **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना भाविकांना स्वर्गराज्यासाठी नेहमी जागृत व सतर्क ठेवण्यास पवित्र आत्म्याची कृपा व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी व अधिका-यांनी देशाचा कारभार पाहत असताना आपल्या सर्व सीमा नेहमी सुसज्ज व शत्रूच्या हल्ल्यापासून सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. वेळ कधी कोणासाठी थांबत नाही म्हणून मिळालेल्या वेळेचा व संधीचा विधायक कार्यासाठी उचित असा उपयोग आम्हा श्रद्धावंतास करता यावा व शहाण्या कुमारींकाप्रमाणे देवाच्या शब्दाशी व आज्ञेशी प्रत्येकांना सतर्क राहता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या धर्मप्रांतातील प्रथम कम्युनियन स्वीकारणा-या मुलांची व त्यांच्या पालकांची योग्य ती तयारी व्हावी तसेच त्यांचे शिक्षक व त्यांना मार्गदर्शन करणा-यां सर्वांवर प्रभूचा भरपूर आशीर्वाद असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या सर्व बालकांवर, वयोवृद्धांवर व आजारी लोकांवर प्रभूचा वरदहस्त असावा, सर्व देशभर जातीय सलोखा निर्माण व्हावा, जगात सर्वत्र शांती प्रस्थापित व्हावी तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक व कौटुंबिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू : हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.